**स्वातंत्र्योत्तर भारतातील कृषी क्षेत्रातील प्रगती**

**(विद्यापीठ पातळीवरील एक दिवसीय चर्चासत्र)**

आझादी का अमृतमहोत्सव या कार्यक्रमाचा भाग म्हणून महाविद्यालयातील इतिहास विभाग व मुंबई विद्यापीठातील इतिहास विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'स्वातंत्र्योत्तर भारतातील कृषी क्षेत्रातील प्रगती' या विषयावर विद्यापीठ पातळीवरील एक दिवसीय चर्चासत्राचे शनीवार दिनांक ६ ऑगस्ट २०२२ रोजी आयोजन करण्यात आले होते.

सदर चर्चासत्रात मुंबई विद्यापीठाच्या इतिहास विभागातील प्राध्यापीका व विद्यापीठाच्या मानव्य शाखेच्या सहयोगी अधिष्ठाता डॉ. मंजीरी कामत, मुंबई विद्यापीठातील इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. प्रकाश मसराम व विभागातील प्राध्यापिका डॉ. नीता खांडपेकर सहभागी झाले होते.

चर्चासत्रात महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. (सौ.) सुचित्रा आ. नाईक यांनी अध्यक्षीय भाषण करून आशीर्वाद दिले. डॉ. प्रकाश मसराम व डॉ. नीता खांडपेकर यांनी विशेष सादरीकरण केले. तसेच महाविद्यालयातील इतिहास विभागप्रमुख श्री. सुभाष शिंदे व कळंबोली येथील एम्.एस्.डी.एल्. महाविद्यालयाच्या इतिहास विभागातील सहा. प्राध्यापक श्री. अविनाश पवार यांनी शोधनिबंध सादर केले.

उद्घाटन सत्रात श्रीमती पी. एन्. दोशी महिला महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या विभागप्रमुख डॉ. (सौ.) मधुमिता बंध्योपाध्याय यांनी बीजभाषण केले.

शोधनिबंध सादरीकरणाच्या सत्राच्या अध्यक्षस्थानी डॉ. मंजीरी कामत होत्या. त्यांनी शोधनिबंध सादर झाल्यानंतर आपले विश्लेषण व विचार मांडले. महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. दीपक साबळे यांनी समारोप सत्राचे अध्यक्षस्थान भूषविले.

चर्चासत्राचा भाग म्हणून इतिहास विभागातील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या भित्तीपत्रकांच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. सदर प्रदर्शनाचे परिक्षण महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागातील सहा.प्राध्यापिका सौ. कल्पना नय्यर यांनी केले.

चर्चासत्राला इतिहास विभागाचे विद्यार्थी व प्राध्यापकवर्ग उपस्थित होते. चर्चासत्राचे सुत्रसंचालन महाविद्यालयाच्या इतिहास विभागातील डॉ. (सौ.) इंद्राणी रॉय व सौ. अक्षता शेनॉय यांनी केले.

सदर चर्चासत्राचे आयोजन करण्यासाठी डॉ. प्रकाश मसराम व विद्यापीठातील इतिहास विभागाने विशेष सहाय्य केले. तसेच विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर व महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. (सौ.) सुचित्रा आ.

नाईक यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.  उपप्राचार्य डॉ. (सौ.) प्रियंवदा टोकेकर व डॉ. महेश पाटील, ग्रंथपाल श्री नारायण बारसे आणि सर्व विभागप्रमुख व समन्वयकांनी मदत केली.

चर्चासत्राची सुरूवात राष्ट्रगीताने तर सांगता पसायदानाने झाली. महवाद्यालयातील विद्यार्थिनी कु. साक्षी भगवे हिने पसायदान सादर केले.

श्री. सुभाष गंगाराम शिंदे

उपप्राचार्य व इतिहास विभागप्रमुख

विप्रमंचे के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त), ठाणे